# तरुण भारत

सातारा

www.tarunbharat.com

₹ ६.०० सोमवार दि. १० मे २०२१ बेळगाव • गो


# कर्मवीर अण्णांना साताऱ्यात अभिवादन



सातारा : अभिवादन पालकमंत्री बाळासाहेब पाटील, रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, विठ्ठल शिवणकर, डॉ. प्रतिभा गायकवाड.


प्रतिनिधी
सातारा


सर्व जातीधर्माच्या गरीब ग्रामीण रयतेला आपल्या भगीरथ प्रयत्नांनी आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करून देणारे महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक, शिक्षणप्रसारक, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांची ६२ वी पुण्यतिथी सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यालयात कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर अत्यंत साधेपणाने साजरी करण्यात आली.

यावेळी पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाधीस्थळी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, विठ्ठल शिवणकर, डॉ. प्रतिभा गायकवाड, शिवलिंग मेनकुदळे यांच्यासह रयत शिक्षण संस्थेतील पदाधिकारी उपस्थित होते.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.